## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रसिध्दी जा.क्र. ६०२
दि. २८/११/२०२३

### - कोटेशन फेर दरपत्रक -

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका प्रसिध्दी विभाग सन २०२३-२०२४ या आर्थीक वर्षाकरीता मनपाचे विविध कार्यक्रमांचे छायाचित्रण (व्हिडीओ शुटींग) करण्याकरीता छायाचित्रणकार (व्हिडीओग्राफर) यांचेकडून कोटेशन फेर दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | मालाचे / साहित्याचे वर्णन |
|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील विविध कार्यक्रमांचे छायाचित्रण (व्हिडीओ शुटींग) करणे. |

१) सन २०२३-२०२४ या कालावधीत महानगरपालिका कार्यालयात व इतर ठिकाणी निर्देशानुसार छायाचित्रण करण्यासाठी उपस्थित रहावे लागेल.

२) शॉपअॅक्ट परवाना, जीएसटी क्रमांक व पॅन क्रमांक असणे आवश्यक आहे. त्याशिवाय बीलाची रक्कम अदा केली जाणार नाही.

३) प्रत्येक कार्यक्रमांच्या छायाचित्रणाच्या सीडी मनपाच्या प्रसिध्दी विभागात जमा करावी लागतील. छायाचित्रणाकरिता प्रति कार्यक्रम असा दर नमूद करावा.

४) पुरवठादाराचे देयक फक्त इसीएस/एनईएफटी द्वारेच प्रदान करण्यात येईल. त्यासाठी संबंधीत पुरवठादाराने कोअर बँकींगची सुविधा असलेल्या बँकेतच खाते असणे बंधनकारक राहील.

५) पुढील आर्थिक वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत सन २०२३-२०२४ च्याच दराने पुढील काम करावे लागेल.

६) सलग तीन कार्यक्रमांस गैरहजर राहिल्यास कुठल्याही प्रकारची पुर्व सूचना न देता कार्यारंभ आदेश रद्द केला जाईल.

७) दरपत्रके मंजूर झाल्यास महानगरपालिकेत अनामत रक्कम रुपये ५०००/- भरावे लागतील व ही रक्कम दरपत्रकांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल. तसेच नियमांचा भंग झाल्यास अथवा कोणत्याही कारणाने टेंडर रद्द झाल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल. अनामत रक्कम मा.उपायुक्तांच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेच्या डी.डी.च्या स्वरुपात स्विकारली जाईल.

८) दरपत्रक मंजूर झाल्यास ५०० रुपयांच्या मुद्रांकावर करारनामा करुन द्यावा लागेल.

९) अनामत रक्कम जमा करुन करारनामा करुन दिल्यानंतर कार्यारंभ आदेश दिला जाईल.

१०) कार्यक्रमाच्या छायाचित्रणांची बीले प्रत्येक महिन्याला सादर करावीत.

११) प्रसिध्दी अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी करावी.

१२) निविदा स्विकारणे अथवा नाकारणे बाबत संपूर्ण हक्क महानगरपालिका आयुक्त यांचेकडे राखून ठेवण्यांत आले आहेत.

१३) प्रसिध्दी विभागाने दिलेल्या पत्रानुसार कार्यक्रमाचे ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे.

संगणक आवक - २८/११/२३

सदरबाबतचे दरपत्रक सिलबंद पाकीटात दि. ६/०२/२०२३ रोजी ५.०० वाजेपर्यंत प्र.प्रसिध्दी अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस समक्ष दाखल करावेत. दि.

प्र.प्रसिध्दी अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका

उपायुक्त (कर),
अहमदनगर महानगरपालिका

प्रत : संगणक विभाग प्रमुख, अहमदनगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर नोटीस मनपा अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

प्रत : हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर नोटीस मनपा नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी.